

# ‘रश्मिन’ साकारताना

- मुक्ता बापट

आज जेव्हा ‘रश्मिन’च्या दिवाळी अंकाच्या मुखपृष्ठाचं रॉ-प्रूफ हातात पडलं तेव्हा क्षणभर विश्वासच बसत नव्हता. सारं स्वप्नवतच वाटत होतं.

रश्मिन! रश्मिन म्हणजे उगवत्या सूर्याचे पहिलं किरण... सोनेरी, सौम्य तरीही उबदार अन् प्रकाशमान. प्रसन्नता आणि रात्री पाहिलेली स्वप्नं खरी करण्याची आशा आणि उमेद निर्माण करणारं, नवं..

आमच्यासारखंच नवं..

नेदरलँडमधील मराठी लोकांना एकत्र आणण्याचं आमचं स्वप्न आमच्या मराठी गाण्यांच्या मैफलरूपी उगवत्या किरणांनी आम्ही सुरुवात केली. हौशी कलाकार! ध्येयाने झपाटलेले..

खूप ‘होमवर्क’ करून हॉलंडमधील मराठी बांधवांची माहिती काढली होती अन् ठरवले ‘हीच ती वेळ.., हाच तो जरिया लोकांपर्यंत पोहोचण्याचा...’

‘बस्... पेटलो.’

आजही आठवतंय मला...

ठिकाण : Resakhout, 25, Zoetermeer

**दृश्य १ :** मी आणि अक्षय आता दोनाचे चार झालो होतो. चौघंही अस्वस्थ, अमोल, रोहिणी, अक्षय आणि मी. मार्ग कोणता? कशी ही अस्वस्थता बाहेर पडणार? वातावरण तंग, पण त्यातच मार्ग सापडला. ‘सुगम संगीत मैफल’. आमची स्टार प्लेअर-स्टार सिंगर होतीच, अर्थातच रोहिणी.

पहिल्या गाण्याची निवडही रश्मिनच्या जन्मवेळेचीच - पहाटेची. ‘केव्हा तरी पहाटे...’ रश्मिननं पहिलं गाणं निवडलं. गायिका होती अर्थातच आमची स्टार सिंगर- रोहिणी!

**दृश्य २ :** ‘‘मी फिलर म्हणून गाणं म्हणेन. फक्त मला तुम्ही गाइड करा. माझी ऑडिशन घेता का त्याआधी?’’ अक्षयने ऑडिशन दिली. आम्हाला शोध लागला.. ‘अक्षय गाऊ शकतो!’ आणि मिळाला आमचा मेल सिंगर- अक्षय!

पण एवढ्याने थोडंच होतंय सारं? तबला, पेटी? पेटी होती अरेंज, पण तबला? आणि वादक?

**दृश्य ३ :** ‘‘कुठंय पेटी?’’ माझे हात नुसते शिवशिवतायेत. वाटलं होतं हॉलंडला आलो अन् पेटीला दुरावलो, आता दोन वर्षं काही दिसायची नाही, पण येऽऽस्... मिळाली हातात. मौलिकच्या चेहऱ्यावरचा आनंद ओसंडून वाहत होता. पेटीचे स्वर कानावर पडले.. ‘प्रथम तुज पाहताऽऽऽ’ आम्हाला पेटीवादक मिळाला.

‘‘अरे अक्षय, मला लॅबमध्ये उशीर होतोय रे! मास्तर बिझी आहे. सबमिशन व्हायला वेळ लागेल. नंतर बसेस् तासा-तासाने आहेत. बरंच लेट होईल रे पोहोचायला.’’

‘‘मी येतो.’’ इति अक्षय. ‘‘झालं की मिस्ड कॉल दे.’’

आला की जो बसायचा मौलिक... ‘पेटी वाजवायला’ हो...

‘‘दोन वाजले रे.. आता बस नाहीयं..’’ आता? मौलिक..

‘‘सोडून येतो ना मी तुला घरी. चल् पुढचं गाणं घे.’’ अक्षय.

मौलिक नेहमी म्हणतो, ‘‘माझे सब्मिशन, एक्झाम्स् आणि पेटी यांच्यात माझी उडालेली तारांबळ माझ्यापेक्षा अक्षयच चांगली सांगू शकेल.’’

आता हवा होता तबला अन् वादक, पण रश्मिनचा कार्यक्रम विधीलिखितच होता. तबला मिळाला, जणू आमच्यासाठीच मागवला होता; पण वादक? वाजवणार कोण?

**दृश्य ४ :** ठिकाण : Resakhout, 25.

Resakhout च्या 'डिस्कव्हरी सेंटर'मध्ये अजून एक आर्टिस्ट डिस्कव्हर झाला. तबला आला अन् त्यावर थाप पडली, तीही उस्तादी! तीही २०-२५ वर्षांच्या मोठ्या अवधीनंतर...!

आम्हाला तबलजी मिळाला. उस्ताद अमोल पाटील. आम्ही सगळे चाट पडलो. अमोलचा चेहरा खुलला होता अन् हसू असं काही ओसंडून वाहत होतं.

''२०-२५ वर्षांनी वाजवतोय रे.. बघू जमतंय का? पण जमतंय रे, जमतंय..'' अमोल.

**दृश्य ५ :** ''अजून काही तरी हवंय. कविता?''

''ए S, तुझी परवाची कविता ऐकव ना सगळ्यांना. कार्यक्रमात फिट्ट बसेल. मस्त आहे ती.'' अक्षय.

''काय? माझी कविता? मी कविता माझ्यासाठी लिहिते. कार्यक्रमामध्ये म्हणजे..'' इति मी स्वतः.

''काही तरीच काय? 'बाथरुम सिंगर आणि स्टेज सिंगर'मध्ये जमीन-अस्मानाचे अंतर असते महाशब्दे!'' मी.

माझी ऑडिशन झाली; त्यांच्यासकट तुम्हीही मला ॲक्सेप्ट केलेत.

आमची निवेदिकाही तयारच होती.

''ए अक्षय, मी कधीच केलं नाहीय रे निवेदन. मी बघू का करून? देशील का मला करायला?'' सुप्रियानं केव्हाच नंबर लावला होता.

''अरे ठीक, आहे ना? ओके ना? प्रेम म्हणजे प्रेम म्हणजे प्रेम असतं...'' जोरदार प्रॅक्टिस चालू असायची रोहिणीच्या स्वयंपाकघरात सुप्रियाची.

२४ डिसेंबर २०११ रोजी जय्यत तयारीनिशी पहिला कार्यक्रम यथोचित पार पडला. तुमच्याबरोबर आम्हीही आनंद लुटला. त्यानंतर फेब्रुवारी २०१२ मध्ये 'भारतीय शास्त्रीय संगीताचा' प्रायोगिक कार्यक्रम झाला. त्याला अनपेक्षित चांगला प्रतिसाद मिळाला- मराठी आणि अमराठी भाषिकांकडून.

आता वेळ होती पुन्हा एकदा मराठी मैफलीची. मात्र या वेळेस आमचं कुटुंब वाढलं होतं.

**दृश्य ६ :** आमच्यात सामील झाले ते केदार आणि सुखदा त्यांच्या छोट्या पियासोबत. 'रश्मिन'च्या पहिल्या रोहिणीकार कार्यक्रमाचे निमंत्रण मिळताच, 'इटस अनबिलिव्हेबल' अशी रिॲक्शन देणारे केदार आणि सुखदा.

पहिल्या कार्यक्रमानंतरच 'मला आवडेल गाणं म्हणायला,' असं सांगून तिसऱ्या कार्यक्रमात सहभागी झालेला केदार आणि ठिकाण Dunantstraat, 322.

पहिल्या मीटिंगमध्ये 'कंपनी' म्हणून आलेली सुखदा लगेचच आमची कंपॅनिअन झाली आणि निवेदिकाही.

''मी करते ट्राय, मी ट्राय करते'' म्हणत म्हणत तिने कार्यक्रमाचं निवेदनही केलं आणि पिया, मराठीत थोडं अडखळत बोलणारी पिया, कार्यक्रमाच्या दिवसाच्या आधी 'मराठीत खेळायला' लागली होती. आमच्यासाठी ही अत्यानंदाची गोष्ट होती. अन् आमच्या प्रयत्नांचे, कार्यक्रमांचे 'जिवंत फलित!

**दृश्य ७ :** ''मागच्या वेळेस नाही जमलं; पण मला माझ्या लोकांसमोर गायचंय पुन्हा एकदा तरी! माझी तशी फार इच्छा आहे.'' दीपिका.

दीपिका- आमची नेक्स्ट फॅमिली मेंबर.

आणि जोडले गेले धागे आमचे तबलजी निखिलशी.

''मला तबला वाजवायला मिळतोय, मला अतिशय आनंद मिळतोय.''

''माझं घड्याळ चालू आहे. तुम्ही चालू करा!''

म्हटल्याप्रमाणे निखिल वाजवायला बसायचा. तो घड्याळाप्रमाणेच न थांबता.. निखिलचा संगीताचा अभ्यास आमच्या सर्वांपेक्षा जास्त आहे. त्याने आम्हाला नेहमीच मार्गदर्शन केलं.

मौलिक आणि निखिल एकाच वयोगटातले. त्यातून सडे आणि वादक. दोघांमधले ट्यूनिंग एकदम फाइन होतं. वाद्य वाजविताना त्यांच्या नजरांचा खेळ फक्त बघतच राहावा. दोघेही तल्लीन.. ब्रह्मानंदी..

मार्च १२च्या प्रॅक्टिस सेशनमधल्या पोळी-भाजी, वरण-भात इ. मस्त मेजवानीबरोबरच दुसरी खिचडी शिजत होती. त्याची वाफ कार्यक्रमात बाहेर आली- 'रश्मिन', 'हॉलंडचा दिवाळी अंक'.

ऐलान तर झाले तरी मन साशंक होते. 'कोणी लिहिलं का? काय लिहितील? लेख, गोष्ट, कविता? कोण बरं लिहीत असेल? फक्त मोजकेच लोक तर लिहिणार नाहीत ना? सगळ्यांनी काही तरी अगदी साधा विनोद, नाही तर कोडं तरी लिहायला हवं! पुन्हा एकदा खूप खूप प्रश्नचिन्हे.

पण आज २७ लेख, १४ कविता, २१ पाककृती आणि बाल विभाग बघून मन भरुन येत आहे. तुम्ही 'आमचं' अजून एक 'आपल्या सर्वांसाठीचं' स्वप्न प्रत्यक्षात आणण्यासाठी मदत केलीत. अर्थातच, अंक 'आपला' आहे, तरीही आपले आभार!

आता या स्वप्नांची बॅकस्टेजची कामं चालू असतानाच अजून काही वेगळी डाळ शिजतेय, Kniekas, 10 मध्ये! ही पहिली शिट्टी आहे. त्यामुळं थोडं थांबा, अजून तीन शिट्ट्या व्हायच्या आहेत. झाकण पडायला थोडा अवकाश आहे.

आणि आम्हाला खात्री आहे की, तुम्ही आमचे हे विविध सुरुची पदार्थ चवीने चाखायला तयार आहात!

*muktaxay@gmail.com*